| MHBI100006562024 | रे.दि.मु.नं. ११५/२०२४ |
|---|---|
| | मनिषा केंद्रे<br>**विरुध्द**<br>विजयकुमार चौरे |

## आदेश नि. २६ वरील

प्रतिवादी क्र. १, ४ व ५ तर्फे प्रस्तूतचा अर्ज त्यांची लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. १, ४ व ५ यांनी मुदतीत लेखी कैफीयत दाखल करणे आवश्यक होते, परंतु ते शेतकरी कुटूंबातील असल्यामुळे व शेती कामात व्यस्त असल्यामुळे त्यांना मुदतीत लेखी कैफीयत व म्हणणे दाखल करता आले नाही. दावा वडीलोपार्जित जमिनीसंदर्भात असून प्रतिवादींचा त्यांचेमध्ये कायदेशीर हक्क आहे. सदर प्रतिवादींना पाच महिने जवाबदावा दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ न झाल्यास प्रतिवादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे देण्यात आले. वादीचे म्हणण्यानुसार, अर्जामधील नमूद कारण संयुक्तिक नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी तसेच वादी यांचेतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा हा वाटणी करुन वेगळा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रं. १ व ५ यांना दि. २२.०६.२०२४ रोजी दाव्यातील समन्सची बजावणी करण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. ४ स्वत:हुन प्रकरणात हजर झाल्याने त्यांना समन्स व नोटीसची आवश्यकता नाही अशी पुरसिस नि.क्र. २१ दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादी यांनी ९० दिवसांच्या आत कैफियत दाखल करणे अपेक्षित होते, परंतु प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत मुदतीत दाखल केलेली नाही. सदरचा अर्ज

प्रतिवादी यांनी दि. १०.०१.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. सदरहू प्रतिवादींना कैफियत दाखल करण्यासाठी साडे तीन महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसून येते. दाव्याची अनेकता निर्माण होऊ नये म्हणून तसेच संतुलित न्यायनिर्णयासाठी सदर प्रतिवादी यांना त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्याची संधी देणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. परंतु सदरहू प्रतिवादीकडून झालेल्या विलंबाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे विलंबाबत सदरहू प्रतिवादींकडून रक्कम वसूल करुन ती वादी यांना देणे संयुक्तीक वाटते. करिता न्यायाच्या दृष्टीकोनातून मी पुढील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रु.५००/- एवढया रक्कमेवर मंजूर करण्यात येतो.

२. सदरहू रक्कम प्रतिवादी क्रं. १, ४ व ५ यांनी वादीला पुढील तारखेपर्यंत अथवा न्यायालयाने दिलेल्या तारखेपर्यंत न दिल्यास हा अर्ज आपोआप खारीज समजण्यात यावा.

सही/-

दिनांक - १०.०१.२०२५

(एस. व्ही. पावसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज